श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

मार्च २०२३ | वर्ष-११ अंक-३ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८

## मा. केंद्रीय गृहराज्यमंत्री श्री. अजय मिश्रा यांची डेरवण वैद्यकीय महाविद्यालयाला सदिच्छा भेट



*मा. ना. श्री. अजयकुमार मिश्रा यांचे स्वागत करताना डॉ. सुवर्णा पाटील, श्री. पुष्कराज मुणगेकर आणि अन्य*

मा. ना. श्री. अजयकुमार मिश्रा, गृहराज्य मंत्री, भारत सरकार यांनी दि. २४ फेब्रुवारी २०२३ रोजी डेरवण येथे भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाला भेट देऊन श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या माध्यमातून डेरवण आणि परिसरात सुरू असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती करून घेतली.

उत्तर प्रदेशातील खेरी लोकसभा मतदार संघाचे प्रतिनिधित्व करणारे मा. श्री. मिश्राजी हे भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते आहेत.

रुग्णालयात आगमन होताच वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी त्यांचे पुषगुच्छ देऊन स्वागत केले. मंत्रिमहोदयांनी रुग्णालयातील विविध विभागांची तसेच वैद्यकीय महाविद्यालयाची पाहणी करून महाविद्यालयाच्या सभागृहात, डॉ. सुवर्णा पाटील यांनी केलेले, संस्थेच्या कार्याविषयी संपूर्ण माहिती देणारे सादरीकरण पाहिले. लो. बाळ गंगाधर टिळक आणि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या स्मारकांनाही त्यांनी भेट दिली.

महाविद्यालयातील सभागृहात सादरीकरण पाहिल्यावर त्यांनी संस्थेच्या कार्याबद्दल अत्यंत समाधान व्यक्त केले. ते म्हणाले, ‘‘जेथे सोयीसुविधांची उणीव आहे अशा या दुर्गम प्रदेशात काम करताना काही रूढी-समजुतींच्याही अडचणी आपणासमोर आल्या असे आपण म्हणालात. त्यांच्याशी झगडूनच आज आपण प्रगतीच्या या महत्त्वाच्या टप्प्यावर आला आहात. आज येथे या संस्थेत आल्यावर मला असे वाटले की सगळ्या जगाबरोबरच






*मा. ना. श्री. अजयकुमार मिश्रा वालावलकर रुग्णालयाची पाहणी करताना*







*मा. ना. श्री. अजयकुमार मिश्रा वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात*

सहकार्य करून जगात जे जे काही नवीन आहे, ते ते आपण येथे आणत आहात. आपण संशोधन क्षेत्रात आहात, शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात काम करीत आहात, क्रीडा क्षेत्रातही आपण काम करीत आहात. आणि वैद्यक, आरोग्य, शिक्षण याचबरोबर पोषणासाठी आपण जे काम करीत आहात, ते फारच मोठे आहे. कुपोषणाचे उच्चाटन करण्याचे फायदे दूरगामी आहेत. कुपोषण नष्ट केल्यामुळे केवळ आपल्या अर्थव्यवस्थेवर चांगला परिणाम होणारा आहे, एवढेच नव्हे, तर भावी पिढी जर कुपोषित असेल तर तिच्या क्षमतांचा पुरेपूर उपयोग होणार नाही. त्यांना कुपोषणातून बाहेर काढून राष्ट्रनिर्माणासाठी आपण मोठाच हातभार लावीत आहात. मला असे वाटते की आपण सगळे एक फार मोठे काम करीत आहात. मी आपले अभिनंदन करतो आणि शुभेच्छाही देतो, की जे काम आपण करीत आहात, ज्या तऱ्हेने पुढे जात आहात, तसेच निरंतर पुढे जात राहा. सादरीकरणात मी पाहिले की आपण संशोधनातही चांगले काम करीत आहात. त्याचा भावी काळात मोठा उपयोग होईलच पण मुलांसाठी आणि मातांसाठी आपण खूपच काम केले आहे. माता आणि बालकांचा मृत्यूदर हा आमच्याही चिंतेचा विषय आहे. त्याकडे आमचेही लक्ष केंद्रित झालेले आहे. कुपोषण, आरोग्य आणि शिक्षण या क्षेत्रात आमचाही एक व्यापक आणि दीर्घसूत्री कार्यक्रम सुरू आहे. त्या दृष्टीने पाहिले तर आपली संस्था एक चांगला संदेश समाजाला देत आहे आणि सेवाही करीत आहे. सगळ्या जगाने जे आपले ध्येय निश्चित केले आहे, विशेषत: आपल्या देशाने, त्याच्या पूर्तीसाठी आपण जे करीत आहात ते अतिशय प्रशंसनीय आहे. मी आपले अभिनंदन करतो आणि आभारही व्यक्त करतो.''

# कॅन्सर पेशंट्स एड एसोसिएशन (सीपीएए)






*डावीकडील छायाचित्र – डावीकडून डॉ. आसावरी मोडक, डॉ. अमेय परांजपे, डॉ. वीणा बोरकर, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. नीता मोरे, डॉ. रवींद्र आंबर्डेकर, डॉ. तृप्ती पोयरेकर*

सौ. नीता मोरे, ('कॅन्सर पेशंट्स एड आसोसिएशन'च्या कार्यकारी संचालिका) आणि त्यांचे इतर सहकारी यांनी गुरुवार, दि. २३ फेब्रुवारी २०२३ रोजी, दुपारी भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाला आणि ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाला भेट दिली. वालावलकर रुग्णालयातील रेडिएशन युनिट, मेडिकल ऑन्कॉलॉजी आणि सर्जरी विभागांना भेट देऊन आणि उपचार सुविधांची पाहणी करून त्यांनी संतोष व्यक्त केला.

# श्रीमती दुर्गा गाडगीळ यांची कार्यशाळा



*श्रीमती दुर्गा गाडगीळ यांची कार्यशाळा*
*Good Clinical Practices*

श्रीमती दुर्गा गाडगीळ यांनी दि. ११ फेब्रुवारी २०२३ रोजी 'Good Clinical Practices' या विषयावर कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेच्या सत्राला इथिकल कमिटीचे सदस्य डॉ. महेंद्र गुलाटी, डॉ. अरविंद यादव, डॉ. विजय डोंबले, डॉ. सुनीता पाटील, डॉ. रिटा मुल्हेरकर, कु. दीपाली परब, डॉ. अभय देसाई, डॉ. सुनीता गोरे, डॉ. आनंद जोशी व डॉ. शिवलीला आणि मेडिकल कॉलजचे प्राध्यापक आणि इतर सहकारी उपस्थित होते.

# इनर सर्कल प्रोग्रॅमची कार्यशाळा



*इनर सर्कल प्रोग्रॅमध्ये सहभागी झालेले ज्युनिअर रेसिडेन्ट्स, इंटर्न्स आणि फिजिओथेरपी विद्यार्थी*

इनर सर्कल प्रोग्रॅमची कार्यशाळा दि. १२ फेब्रुवारी २०२३ रोजी भ.क.ल. वालावलकर रुरल मेडिकल कॉलजेमध्ये ज्युनिअर रेसिडेन्स, इंटर्न्स, फिजिओथेरपी विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आली. इनर सर्कल प्रोग्रॅममध्ये सहानुभूतीने रुग्ण हाताळण्याचे कौशल्य विकसित करणे, रुग्णाबद्दल सहानुभूती आणि संवाद, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. ही कार्यशाळा 'डॉ. रेड्डीज लॅबोरेटरीज'द्वारे आयोजित करण्यात आली होती.

# डॉ. मेघा जोशी यांची वालावलकर हॉस्पिटल मधील सेंट्रल लॅबला भेट



*डॉ. मेघा जोशी, डॉ. ऋता मुल्हेरकर, डॉ. सुनील नाडकर्णी आणि पदव्युत्तर पॅथॉलॉजी विद्यार्थी*

डॉ. मेघा जोशी, एमडी, एफसीएपी या बोस्टनच्या विंचेस्टर, मॅसॅच्युसेट्स उत्तरेकडील कम्युनिटी हॉस्पिटलमध्ये पॅथॉलॉजिस्ट म्हणून कार्यरत आहेत. हॉस्पिटल बेथ इस्रायललाहे हेल्थ सिस्टमचा भाग आहे.डॉ. मेघा जोशी यांनी दि. ११ व १२ फेब्रुवारी २०२३ या दिवशी भ.क.ल. वालावलकर हॉस्पिटलमधील सेंट्रल लॅबला व रुरल मेडिकल कॉलेजला भेट दिली. पॅथॉलॉजी विभागातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांना विविध प्रकारे मार्गदर्शन केले. त्यांनी अमेरिकेतून सोबत आणलेल्या विविध आजारांच्या स्लाइड्स बघायला देऊन त्यावर चर्चा केली, आणि त्या आजारांचे निदान करताना दृष्टिकोन कसा असावा यावर मार्गदर्शन केले. आणि तेथील प्रगत तंत्रज्ञानाबद्दल माहिती दिली. तसेच त्यांनी पदव्युत्तर विद्यार्थ्यांना 'Next-generation sequencing in thyroid cancer' या विषयावर भविष्याच्या दृष्टिकोनातून मार्गदर्शन केले.

# श्री. मनीष रूपानी यांची भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाला आणि ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाला भेट



*डावीकडून डॉ. नेताजी पाटील, डॉ. सुवर्णा पाटील, श्री. मनीष रूपानी आणि श्री. कृष्णा महाडिक (नाना पालकर स्मृती समितीचे ज्येष्ठ सदस्य)*

श्री. मनीष रूपानी (सुमन रमेश तुलसियानी चॅरिटेबल ट्रस्ट) यांनी दि. २७ जानेवारी २०२३ रोजी भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाला आणि ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाला भेट दिली. रुग्णालयाचा हिमोडायलिसिस युनिट्सला भरघोस आर्थिक मदत प्रदान केली आहे. त्यांच्यासमवेत 'नाना पालकर स्मृती समिती'चे ज्येष्ठ सदस्य श्री. कृष्णा महाडिक हेही उपस्थित होते

# हॉस्पिटल बेस्ड कॅन्सर रजिस्ट्री (HBCR) डिपार्टमेंटचे उद्घाटन




*डॉ. महेंद्र गुलाटी HBCR चे उद्घाटन करताना*



*डॉ. श्रीपाद बाणावली HBCR चे उद्घाटन करताना*

कॅन्सर उपचारासाठी अग्रेसर असलेल्या वालावलकर रुग्णालयात दि. १८ फेब्रुवारी २०२३ रोजी हॉस्पिटल बेस्ड कॅन्सर रजिस्ट्री (HBCR) डिपार्टमेंटचे उद्घाटन डॉ. महेंद्र गुलाटी (रेडिऑलॉजिस्ट) व डॉ. श्रीपाद बाणावली (डायरेक्टर ऑफ अकॅडेमिक्स, टाटा मेमोरिअल हॉस्पिटल) याच्या हस्ते करण्यात आले. डॉ. अतुल बुदुख, इन चार्ज, इन कॅन्सर रजिस्ट्री, टाटा मेमोरियल, (ACTREC) यांच्या संयोगाने ह्या डिपार्टमेंटची स्थापना करण्यात आली.

या उद्घाटन प्रसंगी डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. नेताजी पाटील तसेच डॉ. आशुतोष जैन (मेडिकल ऑन्कॉलॉजी), तसेच हॉस्पिटलचे इतर कर्मचारीही उपस्थिती होते.

# ‘वात्सल्य ट्रस्ट’च्या पदाधिकाऱ्यांची डेरवण रुग्णालयाला भेट







*उजवीकडील छायाचित्र - सौ. अमिता राहटे, डॉ. अस्मिता जाधव, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. ज्योती अय्यर, श्री. गिरीश कुलकर्णी, श्री. श्रीकांत खेर, डॉ. अर्चना चौधरी, श्री. अजित पाटील, श्री. श्रीकांत जोशी*

श्री. गिरीश कुलकर्णी, श्री. श्रीकांत जोशी (वात्सल्य ट्रस्ट) आणि त्यांचे अन्य सहकारी यांनी गुरुवार दि. १० फेब्रुवारी २०२३ रोजी, भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाला आणि ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाला भेट दिली.

वात्सल्य ट्रस्ट मुंबई, सर्व वयोगटातील निराधार असलेल्या लोकांसाठी जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी वंश, जात, धर्म आणि लिंग यांचा विचार न करता चिरस्थायी उपाय योजते आणि दत्तक घेणे, अनाथाश्रम, वृद्धाश्रम, निराधार मुलींची काळजी यासाठी सर्वसमावेशक सेवा प्रदान करते. ट्रस्टबरोबर काही प्रोजेक्ट्स सुरू करण्याचा या संस्थेचा मानस आहे

# श्रीगणेश मंदिरात हळदीकुंकू संपन्न आणि त्याद्वारे ‘कर्करोग स्क्रिनिंगचे’ आयोजन



*डावीकडून डॉ. सिमरन आनंद, कु. प्राजक्ता चव्हाण, डॉ. पलक महाजन, डॉ. आकांक्षा मारू, डॉ. शिवांजली शर्मा, डॉ. कल्पलता भैसारे, डॉ. नमिता देशमुख, डॉ. सुमती हिरेमठ, सौ. अमिता रहाटे, कु. साक्षी पालकर, डॉ. पूजा बनकर*

भ.क.ल. वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज आणि रुग्णालय, श्रीक्षेत्र डेरवण येथील आवारात असलेल्या श्रीगणेश मंदिरात दि. २५ जानेवारी २०२३ या दिवशी सामुदायिक हळदीकुंकू सभारंभ ‘प्रतिबंधात्मक आणि सामाजिक औषध विभागा’द्वारे (पी.एस.एम. डिपार्टमेंट) आयोजित करण्यात आला होता. डॉ. नमिता देशमुख, डॉ. कल्पलता भैसारे आणि रुरल हेल्थ सेन्टर आणि इंटर्न्सनी सहभाग घेतला होता. कॅन्सर टेस्ट करण्यासाठी ‘वाण’ या स्वरूपात सोनोग्राफीसाठी कूपन्स दिले.

प्रतिवर्षी संपन्न होणाऱ्या हळदीकुंकू समारंभाला पंचक्रोशीतील सावर्डे, डेरवण, दहिवली, आगवे, कुडप, हडकर्णी, नांदगाव, कोंडमळा, मुंडे, ताम्हणमळा, कोसबी, कुचांबे या गावातील बचत गटाच्या जवळजवळ १३०५ महिला सदस्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# दासनवमी आणि पाठांतर स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ

शिवसमर्थ गड, श्रीक्षेत्र डेरवण येथे प्रतिवर्षाप्रमाणे दासनवमीच्या दिवशी, बुधवार, दि. १५ फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारी २.३० वाजता, पाठांतर स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ साजरा झाला. समारंभासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. वर्षा विनायक देशपांडे (सातारा) या उपस्थित होत्या. शान्तिसूक्त पठणाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रमुख पाहुण्यांनी श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन केल्यावर सौ. क्षमा रानडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

सौ. वर्षा देशपांडे या एम.ए., बी.एड. (हिंदी)असून अनेक सामाजिक उपक्रमात सहभागी असतात.

विश्व हिंदू परिषदेच्या ‘मातृशक्ती’ या संस्थेतर्फे दुर्गाष्टमी कार्यक्रमाचे आयोजन, तसेच महिलांसाठी योगासनवर्ग, मुलांसाठी संस्कारवर्ग, महिला बचत गटांना मार्गदर्शन, पुरासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या वेळी पीडीत लोकांना मदत, कोविड-काळात रुग्णसेवा, शिवथर घळीसारख्या ठिकाणी सहलींचे नियोजन, गीतेचा अभ्यास आणि पाठांतर अशा विविध उपक्रमात त्यांचा महत्त्वाचा सहभाग असतो




सौ. वर्षा विनायक देशपांडे यांचा सत्कार करताना सौ. शरयू यशवंतराव




नृसिंह पंचक स्तोत्र पठण – इयत्ता आठवी

समर्थ श्री रामदासस्वामी हा त्यांच्या भक्तीचा आणि अभ्यासाचा विषय. 'पत्राद्वारे दासबोध' हा अभ्यासक्रम पूर्ण, तसेच 'सखोल दासबोध' अभ्यासाचे १७५ समास पूर्ण, मनाचे श्लोक पुस्तिकेचे वाटप, दासबोध पारायणे आयोजित करणे, वेणाबाई मठापासून १५७ कि.मी. पायी दिंडीचे आयोजन असे विविध उपक्रम केवळ समर्थभक्तीतून आयोजित केले.

प्रमुख पाहुण्यांचा सौ. शरयू यशवंतराव, शिक्षण संचालिका, यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आदी देऊन सत्कार करण्यात आल्यावर आपल्या प्रास्ताविक भाषणात सौ. यशवंतराव यांनी या स्पर्धेचे हे पंचावन्नावे वर्ष आहे असे सांगून ही स्पर्धा सुरू करण्यामागील श्रीसहजानंदसरस्वती महाराजांचा उद्देश, स्पर्धेच्या इतिहासातील महत्त्वाचे टप्पे याविषयी माहिती दिली. ही स्पर्धा पूर्वी परिसरातील वेगवेगळ्या गावी आयोजित केली जायची आणि तेथे कीर्तन आयोजित करून त्या वेळी बक्षीस समारंभ व्हायचा. १९९७ पासून शिव–समर्थ गडात हा एकत्रित समारंभ होतो. त्या वेळी ग्रामीण भागातील काही मुलांचे दोनदोनशे श्लोक पाठ असत आणि ते श्लोकाचा क्रमांक़ सांगितला असता, तो नेमका श्लोक म्हणून दाखवीत. पाठांतराचे महत्त्व आणि फायदे मुलांना सांगून, केवळ पाठांतर नको, तर त्यातील विचारही अंगी बाणवा असे आवाहन त्यांनी मुलांना केले.

यानंतर श्रद्धा पराडकर यांनी, रामदासस्वामी यांनी एका श्रीमंत अहंकारी स्त्रीला अहंकारमुक्त करून कसा उपदेश केला याविषयीची गोष्ट रंजकपणे सांगितली. इंग्लिश मिडियमच्या चौथीतील विद्यार्थ्यांनी रामदासस्वामीकृत आरती, सातवीतील मुलांनी करुणाष्टके तर आठवीतील मुलांनी नृसिंह पंचक स्तोत्र पठण केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस समारंभ झाल्यावर सौ. देशपांडे यांनी आपले विचार व्यक्त केले.

सौ. देशपांडे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाल्या, ''दासनवमीच्या पवित्र दिवशी, समर्थांचे विचार तुम्हा बालमित्रांसमोर मांडायला मिळत आहेत हे माझे भाग्यच आहे. संतांच्या चरित्रातून आपण जगावे कसे हे शिकता येते. लहान वयात पाठांतर सुलभपणे होते आणि त्याचे मनावर उत्तम संस्कारही होतात. बालपण हा पायाभरणीचा काळ आहे. जेवढा पाया मजबूत तेवढी इमारत उत्तुंग ! पेराल ते उगवेल म्हणून स्वार्थ, द्वेष, मत्सर, दुसऱ्याला टोचून बोलणे हे दुर्गुण हेच जर आत्ता पेरले तर पुढे पराभव, अपमान, दु:ख, क्लेश असेच फळ मिळेल. आपल्यातला अहंकार घालविण्यासाठी सर्वच महात्म्यांची चरित्रे वाचा. रामायण, महाभारत, शिवभारत असे ग्रंथ वाचले पाहिजेत. त्यांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवा.

अथक परिश्रम आणि चिकाटी हेही गुण थोरामोठ्यांकडून घ्यावेत. माणसाची सावली जशी सदैव सोबत असते तसे अचूक प्रयत्नही सदैव साथीला असतात. तेच आपणाला यशस्विता देतात. अर्जुनाने कठोर परिश्रम करूनच धनुर्विद्येवर प्रावीण्य मिळविले. आद्य शंकराचार्यांनी केवळ तेहेतीस वर्षांच्या आपल्या आयुष्यात सनातन हिंदूधर्माची पताका देशभर फडकवली. माणसाने आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. माणसाला बुद्धीची देणगी मिळाली आहे, जी अन्य कोणा प्राण्याला मिळालेली नाही. समर्थ सांगतात त्याप्रमाणे आपण योग्य मार्गदर्शन घेतले पाहिजे म्हणजे आपणाला यश हे मिळतेच. प्रयत्नांबरोबर आत्मविश्वाससुद्धा अगदी आवश्यक आहे. अंगी आत्मविश्वास असेल तर सारे जग जिंकता येते. कोणतीही कृती करत असताना आत्मविश्वासाबरोबर आवश्यक असणारा आणखी एक घटक म्हणजे सुदृढ शरीर. सुदृढ शरीर कमविण्यासाठी सूर्यनमस्कार, जोर–बैठका असे देशी व्यायामप्रकार आवश्यक आहेत.केवळ शरीरच नव्हे तर मनही

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com



सौ. वर्षाताई देशपांडे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण



सौ. वर्षाताई देशपांडे आपले विचार व्यक्त करताना



समर्थ रामदास स्वामींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करताना सौ. वर्षाताई देशपांडे



करूणाष्टके पठण - इ. सातवी

सुदृढ असावे लागते. शरीराच्या व्यायामासोबत मनाची मशागत करणेही आवश्यक आहे. आपले मन चंचल असते. चंचल मनाला एकाग्र करण्यासाठी युक्ती, विवेक आणि चातुर्य यांचा वापर करावा. या गुणांचा अवलंब करून आपण स्वत:चे, स्वत:च्या परिवाराचे आणि राष्ट्राचे कल्याण साधू शकू.'' सौ. क्षमा रानडे यांनी आभारप्रदर्शन केले. तर कार्यक्रमाचे सुयोग्य सूत्रसंचालन श्री. ओंकार तांबे यांनी केले. कार्यक्रमाला वेगवेगळ्या शाळांतील विद्यार्थी आणि शिक्षक मोठ्या संख्येने हजर होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६३९ येथून प्रकाशित केले.
Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,
उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०